# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - सप्तसूर
- कवी / कवयित्रीचे नाव :- सुजाता पवार

शारदेने तार वीणेची जराशी छेडता
षड्ज, पंचम, मध्यमादी सूर ते झंकारले
उजळल्या चारी दिशा, अन जागल्या सद्भावना
विमल त्या साती सुरांनी विश्व पावन जाहले

नाद डमरूचा शिवाच्या उमटता गिरिकंदरी
बोल तालाचे पृथेच्या अंतरी सामावले
आदियुगुलाचे निरंतर नृत्य गायन पाहुनी
यक्षकिन्नर, सुरगणांचे भान अवघे हरपले

वेदना संवेदनांची बाग येता बहरूनी
कोष मखमाली सुरांचे जागजागी उमलले
सूर कोमल बासरीचे वाहता रानीवनी
दिव्य शाश्वत संगिताने हे चराचरा व्यापले

Anahat Music Therapy